
सहकार्यम् यशोधनम्
स्थापना – १९४९
www.janatabankpune.com

# गरुड झेप

सन २०१७ – अंक ४ (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खासगी वितरणासाठी)

## अध्यक्षांचे लेखणीतून



चालू आर्थिक वर्ष जीएसटी बाबत सरकारच्या धाडसी निर्णयाने गाजले. छोटे उद्योजक, व्यापारी, छोटे व्यावसायिक यांच्या व्यवहारावर या निर्णयांचा परिणाम होणे स्वाभाविक आहे. कांही व्यवसाय यातून लवकर सावरले तर काही पूर्वपदावर येण्याच्या प्रयत्नात आहेत. बँकातील थकीत कर्जामध्ये वाढ होण्यामागे या निर्णयांच्या परिणामांचा देखील सहभाग नाकारता येत नाही. देशातील सर्वच बँकामध्ये कमी जास्त प्रमाणात हीच परिस्थिती पाहायला मिळते. इतर बँका प्रमाणेच थकीत कर्जाचे प्रमाण आपल्या समोरील आव्हान आहे आणि पुढील तीन महिन्यात वसुलीचे प्रभावी व्यवस्थापन करून ते नियंत्रणात आणणे आपली प्राथमिकता आहे. वर्ष अखेर कमीत कमी ढोबळ अनुत्पादक मालमत्तेचे उदिष्ट आपण निश्चित केले आहे आणि ते साध्य करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे. चालू आर्थिक वर्षाच्या समाप्तीस जेमतेम नव्वद दिवसाचा कालावधी आपणास उपलब्ध आहे त्यामुळे पुढील तीन महिन्यात वसूली होऊन खाते नियमित अथवा बंद करण्यावर या तिमाहीत आपला भर असावा. नव्याने अनुत्पादक होणाऱ्या खात्याची घसरण रोखणे यशस्वी वसूली व्यवस्थापनाचा केंद्र बिंदू मानला जातो. वसूली प्रक्रियेत शाखेतील प्रत्येक कर्मचाऱ्याचा सहभाग आवश्यक आहे. दिनांक ३१.०३.२०१८ पर्यंत थकीत तसेच संभावित थकीत कर्ज खात्यांची अद्यावत यादी शाखांनी मुख्य कार्यालयाकडून प्राप्त करून ही खाती पाठपुराव्यासाठी शाखेतील सर्व कर्मच्यार्यांना वाटप करावीत. शाखास्तरावर वसुलीचा आढावा किमान दर आठवड्याच्या अखेरीस शाखाव्यवस्थापकांनी घ्यावा. प्रभावी पाठपुराव्यासाठी डावपेचाची चर्चा या बैठकीत व्हावी आणि बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी देखील तात्काळ करावी. त्याच बरोबर वसुली प्रक्रिया सुरु होऊन ताबा आणि ताबा घेतलेल्या मालमत्तांचा लिलाव करून विक्रीची किंमत वेळेत प्राप्त होईल यासाठी शाखांनी प्रयत्नशील राहावे. शाखा स्तरांवर वसूली प्रतिनिधी आणि आवश्यकता भासल्यास मुख्यकचेरीची मदत घ्यावी.

उत्पन्नासाठी बँक कर्जावरील व्याजावर अवलंबून आहे. बाजारातील व्यवहार पूर्वपदावर येण्यासाठी उशीर झाल्यामुळे चालू आर्थिक वर्षात कर्जाचा विस्तार तुलनेने मंद आहे. त्याचा परिणाम कर्जावरील व्याजाच्या उत्पन्नावर होवू नये यासाठी मंजूर कर्ज प्रस्तावांच्या वितरणावर शाखांनी भर द्यावा. त्याच बरोबर विचाराधीन कर्ज प्रस्तावावर लवकर निर्णय होऊन कर्जाच्या वितरणासाठी शाखांनी प्रयत्नशील राहावे.

कर्ज विस्ताराप्रमाणेच ठेवींचा विस्तार

➤ पान ३ वर...

## बँकेच्या 'जेट पे' ॲपचे उद्‌घाटन




**JetPay या ॲपचे उद्‌घाटन करताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. श्री. एन.एस. उमराणी व डावीकडून मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर, अध्यक्ष श्री. संजय लेले आणि डॉ. श्री. कॅप्टन चितळे.**

बदलत्या काळानुरूप अत्याधुनिक बँकिंग सेवा देणाऱ्या आपल्या बँकेने 'यूपीआय' या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित 'जेट पे' (जनता ईझी ट्रान्सफर) हे नवीन 'ॲप' विकसित केले आहे. या ॲपचे उद्‌घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एन.एस. उमराणी यांच्या हस्ते दि. ३० डिसेंबर २०१७ रोजी करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे अध्यक्ष श्री. संजय लेले, संचालक मंडळ सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर, डॉ. कॅप्टन चितळे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्डाच्या माध्यमातून ग्राहकांना जास्तीतजास्त सुविधा उपलब्ध होणार आहेत.

याप्रसंगी डॉ. उमराणी म्हणाले की, जनता सहकारी बँकेने **JetPay** ॲपच्या माध्यमातून डिजीटल इंडिया या चळवळीमध्ये सहभाग घेतला आहे. सर्वसामान्य ग्राहकांना **JetPay** च्या माध्यमातून सहजरित्या पैशांची देवाणघेवाण करणे शक्य होणार आहे. ही सेवा जास्तीतजास्त ग्राहकांनी वापरावी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून घ्यावा.

युनिफाइड पेमेंट इन्टरफेस (यूपीआय) या तंत्रज्ञानावर **JetPay** हे ॲप्लिकेशन आधारित असून याच्या माध्यमातून अतिशय वेगात आपण बँकेचा खाते क्रमांक, **IFSC Code**, मोबाइल क्रमांक किंवा आधार कार्ड क्रमांकाचा वापर करून पैशाची देवाणघेवाण करू शकतो. **JetPay** हे गुगल प्ले स्टोअरवरदेखील आता उपलब्ध झाले असून याच्या माध्यमातून ग्राहक ३६५ दिवस आर्थिक व्यवहार करू शकतो. **JetPay** द्वारे केलेले व्यवहार हे अतिशय सुरक्षित असून आपण केलेल्या व्यवहाराची सविस्तर माहिती **Manage Account** या एका रजिस्टरच्या माध्यमातून आपल्याला कळू शकते. **JetPay** हे कुठल्याही स्मार्टफोनवर सहज डाउनलोड करता येऊ शकते. याद्वारे आपण बँक टू बँक व्यवहारदेखील करू शकतो.

ग्राहकांनी या नव्या माध्यमाचा जरूर वापर करावा. या ॲपमुळे डिजिटल व्यवहार करणे आता सहज शक्य होणार आहे. या ॲपसंबंधीची सविस्तर माहिती जनता बँकेच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहे, असे बँकेचे मा. अध्यक्ष श्री. संजय लेले यांनी या वेळी सांगितले. **JetPay** या सुविधेबरोबरच बँकेने नुकतेच रुपे डेबिट कार्डचे प्लॅटिनम कार्ड वितरित करण्यास प्रारंभ केला आहे. या नवीन कार्डच्या माध्यमातून दिवसाला रुपये चाळीस हजार पर्यंत रक्कम काढण्याची

➤ पान क्र. ६ वर ...

# अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!

## खातेदार श्री. विजय भोसले ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये विजयी



गांधीनगर शाखेचे खातेदार श्री. विजय रविंद्र भोसले हे ऑक्टोबर २०१७ मध्ये झालेल्या सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये प्रभाग क्र. ३, हेर्ले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथून सर्वाधिक मतांनी विजयी झाले. बँक परिवारातर्फे श्री. भोसले यांचे हार्दिक अभिनंदन!

## खातेदार श्री. अमेय काळे यांना डॉक्टरेट

चिपळूण शाखेचे प्रतिष्ठित खातेदार श्री. अमेय काळे यांनी 'वूड प्लास्टिक कंपोसिट' या विषयावर डॉक्टरेट (पीएच.डी.) पदवी संपादन केली आहे. भारतात फक्त १० शास्त्रज्ञ या विषयांत पारंगत असून डॉ. अमेय हे कोकणातून व महाराष्ट्रातून एकमेव डॉक्टरेट आहेत.

डॉ. अमेय काळे यांनी दापोली येथील कृषी विद्यापीठातून बीएस्सी तसेच डेहराडून येथे एमएस्सी ही पदवी घेतल्यानंतर बंगळुरू येथून पीएच. डी. पदवी मिळवली आहे. या यशाबद्दल बँक परिवारातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!

## खातेदार प्राचार्य डॉ. दिलीप शेठ यांना 'मानवाधिकार' पुरस्कार प्राप्त



आपल्या टिळक रोड शाखेचे खातेदार व शिक्षण प्रसारक मंडळीच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप शेठ यांनी शिक्षणसेवा व अध्यापन क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल त्यांना रविवार, दि. १० डिसेंबर २०१७ रोजी मा. मधुकररावजी कांबळे राज्यमंत्री, मा. प्रसादजी अक्कानौर (IPS) यांचे हस्ते 'मानवाधिकार पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. कार्यक्रमास मा. श्री भूषणकुमार उपाध्यक्ष (IPS) अप्पर पोलीस सहसंचालक कारागृह, पुणे हेही उपस्थित होते.

दरवर्षी १० डिसेंबर हा दिवस 'जागतिक मानव अधिकार दिवस' म्हणून साजरा केला जातो. प्रखर शोध मोहीम सोसायटी, पुणेद्वारे मानवी हक्क संरक्षणार्थ विविध उपक्रम राबविले जातात. या दिवशी विविध क्षेत्रांमध्ये मानवतेच्या दृष्टिकोनातून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना त्यांच्या कार्याची दखल घेऊन संस्थेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात 'मानवाधिकार पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येते.

## ओतुर शाखेचे खातेदार सभासद श्री. मंगेश डुंबरे यांचा महाराष्ट्र राज्य कृती समितीतर्फे गौरव

शाखेतील सन्माननीय खातेदार/ सभासद श्री. मंगेश उत्तमराव डुंबरे यांचा महाराष्ट्र राज्य कृती समितीतर्फे कृतिशील लेखनिक म्हणून गौरव करण्यात आला. त्या अनुषंगाने शाखेत मा. शाखा व्यवस्थापक श्री. बाबासाहेब जाधव व इतर कर्मचारी वृंद यांचे उपस्थितीत त्यांचा सत्कार करण्यात आला.



## आंतरशालेय स्कूल ऑलिम्पिक स्पर्धेत चि. यश शिंदेला रौप्य पदक प्राप्त

बँकेच्या सीबीओसी विभागातील कनिष्ठ अधिकारी श्री. दत्ता शिवाजी शिंदे यांचा मुलगा चि. यश दत्ता शिंदे, इ. ७ वी, सिंहगड स्प्रिंगडेल स्कूल, याला सकाळ पेपर्स आणि पी.एन. ज्वेलर्स यांनी आयोजित केलेल्या आंतरशालेय स्कूल ऑलिम्पिक स्पर्धेत तायक्वांदोमध्ये सिल्व्हर मेडल मिळाले आहे. चि. यश याचे हार्दिक अभिनंदन!



## चिंचवड शाखेचे खातेदार व सभासद श्री. रमेश इनामदार यांना राज्यस्तरिय पुरस्कार



आपल्या चिंचवड शाखेचे जुने खातेदार, सभासद व पिंपरी चिंचवड निवृत्त संघटना चिंचवड शाखेचे कार्यवाह श्री. रमेश अंबादास इनामदार यांना १७ डिसेंबर रोजी 'पेन्शनर्स डे' च्या निमित्ताने पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात प्रतिष्ठेचा 'एस.एम. जोशी पुरस्कार' श्री. उद्धव कानडे यांचे शुभहस्ते व श्री. भाई वैद्य यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. सेवानिवृत्तांसाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन पुणे शहर निवृत्त सेवक महासंघातर्फे हा पुरस्कार दिला जातो. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख ११११/- रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. राज्यस्तरीय या पुरस्कारासाठी पुणे व पिंपरी चिंचवड परिसरातून श्री. इनामदार यांची निवड करण्यात आली. श्री. इनामदार हे सेवानिवृत्त शिक्षक असून चिंचवडगाव ज्येष्ठ नागरिक संघाचे कोषाध्यक्ष म्हणून काम करीत आहेत. ते आदर्श शिक्षक, उत्तम वक्ते व ज्येष्ठ साहित्यिक आहेत. त्यांना शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील कार्याबद्दल अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांची 'कलश व फुलोरा' ही दोन पुस्तके प्रकाशित झाली असून वृत्तपत्रे, मासिकातून त्यांच्या कथा, कविता, ललितलेख प्रसिद्ध झालेले आहेत.

# बोरिवली शाखेमध्ये 'हिंदी दिवस' कार्यक्रमाचे आयोजन



बोरिवली शाखेमध्ये १४ सप्टेंबर २०१७ रोजी हिंदी दिवसाचे औचित्य साधून एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये रा.स्व. संघ, गोरेगाव विभाग संघचालक मा. राजाभाऊ भांगे, श्री. रघुवीर मटेगावकर, श्री. श्रीधर साठे व शाखेचे सन्माननीय ग्राहक उपस्थित होते. उपस्थित मान्यवर व शाखा प्रबंधक श्री. रविशंकर वाव्हळ यांनी दीपप्रज्वलन केले. वाव्हळ यांनी बँकेच्या प्रगतीबद्दल माहिती दिली. हिंदी भाषेचे विद्वान व सामाजिक कार्यकर्ते श्री. बाळासाहेब भागवत यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी हिंदी दिवसाबद्दलची माहिती मनोरंजक पद्धतीने दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन राजन शिर्के यांनी केले. या कार्यक्रमामध्ये 'हिंदी विवेक' या अंकाचे वितरण करण्यात आले. त्या साठी या अंकाच्या वितरण व्यवस्थापकांचे सहकार्य लाभले.

## भावपूर्ण श्रद्धांजली

बँकेच्या कर्वेनगर शाखेतील लेखनिक श्री. विजय पांडुरंग कदम यांचे दि. २४/१०/२०१७ रोजी व अंबाजोगाई शाखेतील शिपाई श्री. अश्विनकुमार आदिनाथ कासले यांचे दि. १/१२/२०१७ रोजी दुःखद निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

➤ पान १ वरून

## अध्यक्षांचे लेखणीतून

देखील तेवढाच महत्वाचा आहे. ठेवीं तसेच कर्जाच्या अनेक ग्राहकोपयोगी योजना बँकेने ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या आहेत. या योजनांना ग्राहकांपर्यंत पोहोचविणे आणि त्यातून व्यवसायाचा विस्तार करणे आपली जबाबदारी आहे. आपला माहिती तंत्रज्ञान विभाग अद्ययावत साधन सामुग्रीने समृद्ध आहे. त्यामुळे माहिती तंत्रज्ञानावर आधारित ऑनलाईन पेमेंट सुविधेसह इंटरनेट बँकिंग, इ बँकिंग लॉबी, मोबाईल बँकिंग सुविधा, BHIM, BBPS, UPI, NEFT, RTGS, NSDL - CDSL Depository, जनरल, लाइफ इन्शुरन्सची सुविधा, विदेशी भारतीयांच्या ठेवी, ट्रस्टी आणि एक्झीक्युटीव्ह सुविधा, विदेश विनिमय सुविधा, मोबाईल द्वारे इंटरनेट बँकिंगची सुविधा, रुपे डेबिट कार्ड, इ कॉमर्स या सारख्या अद्ययावत सुविधा आपण ग्राहकाना उपलब्ध करून देत आहोत. युपीआय या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित जेट पे या ॲप्लीकेशनचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू मा. डॉ. उमराणी यांचे हस्ते नुकतेच संपन्न झाले. त्यामुळे मोबाईल फोन मधून पैश्यांची देवाण घेवाण, युटीलीटी पेमेंटस्, खात्यावरील शिल्लक तपासणे इ. सुविधा आपल्या ग्राहकांना जेट पे च्या माध्यमातून प्राप्त होणार आहेत.

आव्हानांना यशस्वीपणे सामोरे जात यश खेचून आणणे आपला स्थायीभाव आहे. पुढील तीन महिने आपण सर्व मिळून जोमाने प्रयत्न करू आणि वर्ष अखेर पुन्हा एकदा ऐतिहासिक उज्वल कामगिरीची नोंद करू याचा मला विश्वास आहे. सर्वांना नविन वर्ष २०१८ साठी शुभेच्छा !

# मुंबई विभागातील सेवकांचे परिवार स्नेहसंमेलन



शनिवार दि. ४/११/२०१७ रोजी स्टाफ वेल्फेअर असोसिएशन मुंबई विभाग व बँक यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईमध्ये दादर (प.) येथील महाराष्ट्र हायस्कूलमधील सभागृहात परिवार स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमामध्ये सर्व सेवक पारंपारिक वेशामध्ये उपस्थित होते.

बँकेचे अध्यक्ष मा. श्री. लेले, उपाध्यक्ष मा. श्री. कदम, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. काकतकर, मुंबई विभागातील दोन्ही संचालक मा. श्री. परांजपे व मा. श्री. मोहन फडके यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. सुरुवातीला सेवकांनी व परिवारातील मंडळींनी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम प्रस्तुत केले, ज्यामध्ये गायन व नृत्य सादरीकरण झाले.

सुप्रसिद्ध गायिका श्रीमती माधुरी करमरकर यांच्या सुमधुर गाण्यांचा आस्वाद श्रोत्यांना अनुभवता आला. १० वी व १२ वी मध्ये उत्तीर्ण पाल्य तसेच **JAIIB** व **CAIIB** मध्ये उत्तीर्ण सेवकांचा कौतुक समारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी असोसिएशनचे अध्यक्ष श्री. विजय निल्दावार व अन्य कार्यकारिणी सदस्य आवर्जून उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये असोसिएशनचे मुंबई प्रतिनिधी श्री. शैलेष घोसाळकर यांनी प्रास्ताविक केले, तर मा. श्री. संजय लेले, अध्यक्ष व मा. श्री. जयंत काकतकर, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## शाखा वर्धापन दिनाच्या शुभेच्छा! (माहे जानेवारी ते मार्च)

| | | | |
|---|---|---|---|
| तळेगाव दाभाडे | २९ जानेवारी | टिळक रोड | २७ फेब्रुवारी |
| कडवई | २९ जानेवारी | शनिवार-नारायण पेठ | २७ फेब्रुवारी |
| कर्वेनगर | १ फेब्रुवारी | औरंगाबाद | २७ फेब्रुवारी |
| शिवाजीनगर, पुणे | ३ फेब्रुवारी | इंदापूर | २९ फेब्रुवारी |
| बाणेर | १४ फेब्रुवारी | ठाणे-घोडबंदर रोड | १ मार्च |
| तळेगाव स्टेशन | १७ फेब्रुवारी | सिंहगड रोड | ५ मार्च |
| कांदीवली | १७ फेब्रुवारी | पाषाण-सूस रोड | ६ मार्च |
| चिंचवड स्टेशन | २५ फेब्रुवारी | पौड रोड | २१ मार्च |
| जुन्नर | २६ फेब्रुवारी | सोलापूर | २१ मार्च |
| लातूर | २६ फेब्रुवारी | | |

# मातोश्री वृद्धाश्रम येथे इच्छानिधी बाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन

आपल्या बँकेच्या एक्झिक्युटर व ट्रस्टी विभागामार्फत मातोश्री वृध्दाश्रम, कर्वेनगर येथे इच्छापत्र व खाजगी विश्वस्त निधीबाबत माहिती देण्याकरिता वृद्धाश्रमातील आजी-आजोबांसाठी दि.२९ नोव्हेंबर २०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजता मेळावा आयोजित करण्यात आला होता.

सदर मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक ॲड. दादासाहेब बेंद्रे उपस्थित होते. तसेच बँकेचे उपमहाव्यवस्थापक श्री.धनंजय देशपांडे, एक्झिक्युटर व ट्रस्टी विभागातर्फे कनिष्ठ अधिकारी श्री.किशोर चव्हाण, लेखनिक कु. अक्षता पुजारी आणि मातोश्री वृद्धाश्रमातील शंभरहून अधिक आजी-आजोबा उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. देशपांडे, मातोश्री वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक यांनी केले. इच्छापत्राची आवश्यकता त्यांनी प्रास्ताविकात मांडली. तसेच ॲड. दादासाहेब बेंद्रे, व बँकतील सेवकांचे तसेच उपस्थित सर्व जेष्ठ नागरिकांचे स्वागत केले.

श्री. किशोर चव्हाण यांनी एक्झिक्युटर व ट्रस्टी विभागाची माहिती उपस्थितांना दिली. जनसामान्यांच्या गरजेची पूर्तता करण्यासाठी जनता बँकेने एक्झीक्युटर व ट्रस्टी विभाग वर्ष १९८९ मध्ये स्थापन केला. इच्छापत्राचे व्यवस्थापनासाठी व्यक्ती पेक्षा संस्था बरी या हेतूने आजपर्यंत अनेक इच्छापत्रांचे, तसेच खाजगी आणि सार्वजनिक न्यासाचे व्यवस्थापन विभागाकडे असून उत्कृष्ट व्यवस्थापन करणारी संस्था म्हणून जनता बँकेकडे खऱ्या अर्थाने विश्वासाने पाहिले जाऊ लागले असे श्री. चव्हाण यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक ज्येष्ठ वकील ॲड. दादासाहेब बेंद्रे यांचा विस्तृत परिचय करून दिला. तसेच बँकेचे उपमहाव्यवस्थापक श्री धनंजय देशपांडे यांचाही परिचय श्री. चव्हाण यांनी करून दिला.

कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक ॲड. दादासाहेब बेंद्रे यांनी 'इच्छापत्र या विषयासाठी ९९ वे व्याख्यान आहे, असे सुरवातीस नमूद केले. ते पुढे म्हणाले, इच्छापत्र म्हणजे आपली शेवटची इच्छा! शेवटची इच्छा म्हणजे आपल्या हयातीत कमविलेल्या मिळकतीचे योग्य प्रमाणे व्यवस्थापन करणे. भारतीय परंपरेनुसार वय झाले की म्हणजे वयाच्या साठाव्या वर्षी इच्छापत्र बनवणे. परंतु तसे नसून इच्छापत्र करण्यासाठी कोणतीही वयाची अट नाही. इच्छापत्र १८ वर्ष पूर्ण व त्यावरील सज्ञान व्यक्ती आपल्या स्वकष्टार्जित मिळकतीचे वाटप करण्याकरिता करु शकते. अमेरिकेत तर प्रत्येक व्यक्तीने इच्छापत्र बनविणे हे अपरिहार्य आहे असे नमूद केले. इच्छापत्र करण्याकरिता कायद्याची भाषा वापरावी असे नाही. वकिलाची आवश्यकता आहे असेही नाही. इच्छापत्र रजिस्टर करणे बंधनकारक नाही, परंतु इच्छापत्र रजिस्टर केले असेल तर भविष्यात कुठलेही वाद निर्माण झाल्यास इच्छापत्र सिध्द करायला सोपे जाते.

इच्छापत्र कायदेशीर होण्यासाठी इच्छापत्रधारकाचे नाव, पत्ता, तारीख, सही तसेच दोन साक्षीदाराचे नाव व सही आणि डाव्या हाताचे निशाणी अंगठा, वैद्यकीय प्रमाणपत्र याची आवश्यक असते. साक्षीदार इच्छापत्रधारकापेक्षा कमी वयाचा असावा तसेच साक्षीदार हा इच्छापत्राचा लाभार्थी नसावा, असे असेल तर इच्छापत्र बेकायदेशीर ठरेल. इच्छापत्र सिद्ध करण्याकरिता न्यायालयाकडून प्रोबेटसुध्दा मिळवता येते. इच्छापत्राचे व्यवस्थापन मृत्यूपश्चात होणार असल्याने त्यासाठी एका चांगल्या व्यवस्थापकाची नेमणूक करणे आवश्यक असते. व्यवस्थापक म्हणून नेमणूक केलेली व्यक्ती लाभाधिकारी नसावी, असे ॲड. दादासाहेब बेंद्रे यांनी नमूद केले. तसेच इच्छापत्र बनविणे बाबत त्यांना आलेल्या अनुभवातील अनेक घटना सांगून त्याबाबतच्या समस्येवर उपाय सांगितले.

व्यक्तीचे वय वाढत जाते तशी व्यक्ती मानसिक दृष्टीने दुर्बल होते. आपल्याला कधी दुसऱ्यांसमोर हात पसरावे लागू नयेत याची काळजी आपण घ्यायची.आपली सोय आपण करायची, असे त्यांनी नमूद केले.

ॲड. दादासाहेब बेंद्रे यांनी शेवटी चहा पेक्षा रस बरा हे उदाहरण देऊन, बक्षिसपत्रा पेक्षा इच्छापत्र बरे असे सांगून त्यांनी इच्छापत्र आणि खाजगी विश्वस्त निधीचे मार्गदर्शन पूर्ण केले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. अनेक जेष्ठ नागरिकांच्या शंकांवर ॲड. दादासाहेब बेंद्रे यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

मातोश्री वृद्धाश्रमातील आजोबा श्री अभय देशपांडे यांनी आभार प्रदर्शन केले. तसेच श्री. किशोर चव्हाण यांनी वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक श्री.देशपांडे यांना धन्यवाद देऊन जनता सहकारी बँकेस इच्छापत्रा बद्दल मार्गदर्शन करण्याकरिता संधी दिल्याबद्दल मातोश्री वृद्धाश्रमाचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता सामुहिक पसायदानाने झाली. कार्यक्रम संपल्यावरही अनेक ज्येष्ठ नागरिक ॲड. श्री. बेंद्रे आणि श्री. किशोर चव्हाण यांना कायदेविषयक विविध शंका विचारीत होते.

मेळाव्याच्या निमित्ताने वृद्धाश्रमातील अनेक आजी-आजोबांशी सवांद झाला, त्यातून त्यांच्या समस्यांची जाणीव झाली आणि त्यांच्याबद्दल नक्कीच आपुलकी निर्माण झाली.

**एक्झीक्युटर व ट्रस्टी विभाग**

## भांडवल उभारणीबाबत श्री. विजय भागवत यांचे उपस्थितांना मार्गदर्शन

दि. ११ नोव्हेंबर २०१७ रोजी पब्लिक प्लेसमेंटच्या माध्यमातून भांडवल उभारणीबाबत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. बँकेच्या पुणे शहरातील शाखांमधील मोठे व्यावसायिक/उद्योजक सदर कार्यक्रमात सहभागी झाले होते. सिद्धार्थ एज्युकेशन लि., चे संचालक आणि बँकेचे खातेदार श्री. विजय भागवत आणि मुंबई स्टॉक एक्स्चेंजचे प्रतिनिधी व मर्चंट बँकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## गोरेगाव शाखेमध्ये स्थानिक सल्लागार समितीची एकत्रित बैठक

मुंबईतील बोरिवली, कांदिवली व गोरेगाव शाखेतील स्थानिक सल्लागार समिती सभासद, ग्राहक सेवा समिती व स्थानिक संघ कार्यकर्ते यांची एकत्रित बैठक दि. २४/११/२०१७ रोजी बँकेच्या गोरेगाव शाखेत संपन्न झाली. या कार्यक्रमास बँकेतर्फे संचालक मा. श्री. मोहन फडके व सीपीसी मुंबई विभागाचे विभाग प्रमुख श्री. चंद्रशेखर प्रभुणे, सहा. महाव्यवस्थापक हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात गोरेगाव शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. अंकुश बेटकर यांनी प्रास्ताविक व परिचय करून देण्याने झाली. त्यानंतर तीनही शाखा व्यवस्थापक यांनी आपापल्या शाखेतील स्थानिक सल्लागार तसेच ग्राहक सेवा समितीच्या सभासदांचा परिचय करून दिला. यानंतर कांदिवली शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. रविंद्र लिमये यांनी बँकेची माहिती व प्रगती सगळ्यांना सांगितली. कार्यक्रमाचा समारोप संचालक श्री. मोहन फडके यांनी करताना छोट्या लोकांची मोठी बँक याबाबत सदस्यांना माहिती दिली. बँकेचे डेटा सेंटर अद्ययावत असून तांत्रिक बाबीत खाजगी बँकेशी स्पर्धा करू शकते असे सांगितले. बोरिवली शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. रविशंकर व्हावळ यांनी सर्वांचे आभार मानले.

# अभिनंदन !!!

## बँकिंग परीक्षेतील यशाचे मानकरी.....

### सी. ए. आय. आय. बी.

| नाव | शाखा/विभाग | वर्ष |
|---|---|---|
| दिनेश रघुनाथ कुलकर्णी | ऑडिट विभाग | डिसेंबर २०१७ |
| श्री. निलेंद्र चंद्रशेखर अभ्यंकर | चिपळूण | डिसेंबर २०१७ |

### जे. ए. आय. आय. बी.

| नाव | शाखा/विभाग | वर्ष |
|---|---|---|
| श्री. विजय वसंत चौधरी | लातूर | नोव्हेंबर २०१७ |
| श्री. रोहित लक्ष्मण जोशी | कोल्हापूर | नोव्हेंबर २०१७ |
| सौ. कल्याणी मनिष देशपांडे | कोअर बँकिंग | नोव्हेंबर २०१७ |
| सौ. प्राजक्ता रोशन पळशीकर | चिपळूण | जुलै २०१७ |
| कु. नेहा श्रीकृष्ण मुंगसे | सीबीओसी | नोव्हेंबर २०१७ |

### एन. आय. एस. एम

| नाव | शाखा/विभाग | वर्ष |
|---|---|---|
| श्री. राहूल अमृत शिवतारे | टिळक रोड | नोव्हेंबर २०१७ |
| श्री. अतुल प्रभाकर आचार्य | गुंतवणूक विभाग | डिसेंबर २०१७ |
| श्री. सौरभ पद्माकर पवार | ए.एस.बी.एल. | डिसेंबर २०१७ |

### ए. एम. एल. / के. वाय. सी.

| नाव | शाखा/विभाग | वर्ष |
|---|---|---|
| सौ. प्राजक्ता रोशन पळशीकर | चिपळूण | जून २०१७ |

### एम.एस.एम.ई.

| नाव | शाखा/विभाग | वर्ष |
|---|---|---|
| श्री. उदय वसंतराव कुलकर्णी | कोल्हापूर | जानेवारी २०१८ |

### आय.टी. सिक्युरिटी

| नाव | शाखा/विभाग | वर्ष |
|---|---|---|
| श्री. यशवंत नारायण ढवळीकर | प्रशासन | जानेवारी २०१८ |
| श्री. सुशील राजेंद्र बांदल | कोअर बँकिंग | जानेवारी २०१८ |

# मुंबईमध्ये स्टाफ वेल्फेअर असोसिएशन, मुंबई विभागातर्फे बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन



रविवार दि. ८/१०/२०१७ रोजी, दादर येथील महाराष्ट्र हायस्कूलच्या पटांगणात बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मुंबईतील १० शाखांमधून एकूण ८८ जणांनी स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. एकूण ८ संघ तयार करण्यात आले होते, ज्यामध्ये महिलांचा सहभागही चांगला होता. तसेच ५ शाखांचे शाखा व्यवस्थापकही सदर स्पर्धेला उपस्थित होते. मुंबई क्रिकेट असोसिएशनमधील अनुभवी पंच श्री. म्हात्रे यांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली व भोजनोत्तर कार्यक्रमाची सांगता झाली.

# आंतर सहकारी बँक रस्सीखेच स्पर्धेत आपल्या बँकेच्या महिला संघाने मिळविले विजेतेपद

क्रीडा भारती पुणे महानगर आयोजित आंतर सहकारी बँक रस्सीखेच स्पर्धेत आपल्या बँकेच्या महिला संघाने विजेतेपद मिळविलेले आहे. आपल्या बँकेच्या महिला संघाने सलग दोन वर्षे या स्पर्धेत विजेते पद मिळविलेले आहे.



महिला संघ - प्रज्ञा स्वामी, भाग्यश्री शीपटे, चैत्राली जाधव, रेणुका थत्ते, रुपाली कदम, अपर्णा कदम, स्वाती जगताप. सोबत विजय रजपूत, बिरू खोमणे (मा. संचालक), अभिजीत माकाशीर व आनंद कंदलगावकर

# माहे ऑक्टोबर ते डिसेंबर २०१७ या कालावधीत सेवानिवृत्त झालेले सेवक

| नाव | हुद्दा | शाखा/विभाग |
|---|---|---|
| श्री. धनंजय मो. चिपळूणकर | सहा. महाव्यवस्थापक | मार्केटिंग |
| श्री. प्रफुल्ल कृ. कुलकर्णी | कनिष्ठ अधिकारी | जुन्नर |
| श्री. मनोद दि. टेंबे | कनिष्ठ अधिकारी | गिरगाव |
| श्री. राजेंद्र दा. म्हसवडे | कनिष्ठ अधिकारी | ऑडिट इन्स्पे. |
| श्री. शरद र. शेंबवणेकर | लेखनिक | लांजा |
| श्री. हरेशकुमार बा. रावळ | लेखनिक | खेडब्रम्हा |
| श्री. दिलीप सा. जगताप | लेखनिक | कॅश सेल चिंचवड |

# बँकेच्या पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशनद्वारा आयोजित महिला सेवक मेळावा उत्साहात संपन्न






रविवार दि. ९ डिसेंबर २०१७ रोजी विविध शाखा तसेच मुख्य कचेरी विभागांतील महिला कर्मचाऱ्यांचा मेळावा पुणे येथे संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात आपल्या बँकेच्या संचालिका मा. डॉ. सौ. मधुरा कसबेकर यांच्या मार्गदर्शनाने झाली. त्यांनी अतिशय छान आणि नेमक्या शब्दांमध्ये महिला मेळावा एकत्रीकरणाचा उद्देश मांडला. परस्पर संपर्क, सकारात्मक दृष्टिकोन, स्वसंवाद साधून कामाच्या एकाग्रतेवर भर देवून काम करा असे त्यांनी सुचविले. त्यानंतर प्रमुख वक्त्या म्हणून भगिनी निवेदिता बँकेच्या मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. स्मिताताई देशपांडे यांनी विचार मांडले.

महिलांनी बँकेत काम करत असताना कोणते गुण अंगीकारणे आवश्यक आहे, याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. महिलांमध्ये असलेली कार्यक्षमता व त्यांच्यामधील निरनिराळ्या गुणांची (Multi Tasking, Team Players, Flexible & very Efficient) जाणीव त्यांनी करून दिली. कामाच्या ठिकाणी परस्परसंवाद कसा साधावा, वैयक्तिक ओळखीचा वापर बँकेच्या व्यवसाय वृद्धीसाठी कसा करावा, यावर त्यांनी मार्गदशन केले. महिलांनी आपण नोकरी करत आहोत, असे न समजता बँकिंग बिझनेस करीत आहोत असा दृष्टिकोन बाळगला पाहिजे, Risk assessment करता आली पाहिजे. स्वतःमध्ये असलेली ताकद ओळखून काम करा. गरज पडलीच तर दुर्गेचे रुपही धारण करता आले पाहिजे. माणसांना ओळखायला शिका. मन आणि शरीर प्रसन्न ठेवा, म्हणजे तुमचे काम अधिक चांगल्या प्रकारे करु शकाल. चांगले वाईट ओळखून काम करा आणि कायम दुसऱ्याच्या मदतीसाठी सज्ज रहा. टीम वर्कने काम करा. असे बहूमोल मार्गदर्शन केले.

सौ. स्मिताताई यांच्या बोलण्यातून जनता बँकेबद्दलचा आपलेपणा जाणवत होता. भगिनी निवेदिता बँकेला जी ट्रेनिंग्ज होतात, ती जनता बँकेच्या ट्रेनिंग सेंटरमधून घेतली जातात असे त्यांनी आवर्जून सांगितले. त्याचप्रमाणे जनता बँकेने महिलांना जास्तीतजास्त संधी देण्याचा जो निर्णय घेतला तो कसा रास्त आहे हे दाखवून देण्यासाठी सर्व महिलांनी आपले कौशल्य पणाला लावून आपल्या संस्थेला पुढे नेण्यासाठी १००% प्रयत्न करावा असेही त्यांनी सांगितले.

त्यानंतर दुसरे सत्र हे श्री. महेशजी कुदळे यांचे Personal Financial Planning for Working Women या विषयावर झाले. त्यांनी अत्यंत योग्य आणि अचूक प्रकारे आपण कमावलेल्या पैशाचे कसे नियोजन करावे याबद्दल सविस्तर माहिती दिली. येणाऱ्या उत्पन्नानुसार खर्च वजा जाता गुंतवणूक कुठे आणि कशी करावी, त्याचा परतावा काय असेल, प्रत्येक वयोगटानुसार करावयाचे खर्च व बचतीचे नियोजन याबद्दल त्यांनी माहिती दिली.

गुंतवणूक करताना कोणत्या गोष्टी पाहणे गरजेचे आहे, जिथे गुंतवणूक करणार आहोत तिथून Returns मिळतील ना, तसेच ज्या कंपनीमध्ये गुंतवणूक करत आहोत त्या कंपनीचा रिव्ह्यू घेणे, त्याचबरोबर त्यांनी अनेक वेगवेगळ्या गुंतवणुकीच्या सोयी आणि त्यांचे प्रकार याबद्दल देखील माहिती दिली. उदा.

PPF, Post Office Saving Scheme, Bank Deposit, Mutual Fund, Life Insurance, Real Estate etc.

अशा विविध प्रकारांत गुंतवणूक करण्याचे फायदे व सोयी याबद्दल महिलांना कळेल अशा पद्धतीने गरज पडेल तेव्हा रेसिपी स्वरूपातदेखील त्यांनी मार्गदर्शन केले.

त्यानंतरच्या सत्रात सामाजिक बांधिलकी या विषयावर राष्ट्रसेविका समितीच्या सदस्या मीनाताई कानडे, लीना घारपुरे व ज्योती भिडे यांनी त्यांच्या कामाची माहिती करून दिली. समितीची स्थापना कधी झाली, त्याची सुरुवात ताई आपटे आणि ताई केळकर यांनी कशी केली या बद्दल सांगितले. समितीच्या कुठे शाखा आहेत, तिथे काय काम चालते, शाखेतले वेगवेगळे खेळ, देशभक्तीपर गीते, स्त्री संरक्षणासाठी/आत्मरक्षणासाठी लाठी–काठीचे प्रशिक्षण या बद्दल ही त्यांनी माहिती दिली. सामाजिक बांधिलकी म्हणजे काय हे सांगत असतानाचा लीनाताई घारपुरे यांनी 'देश हमें देता है सब कुछ', 'हम भी कुछ देना सीखें' अशा सुंदर शब्दांत त्याचे वर्णन केले. आपला वेळ हा आपण आपल्या घरासाठी देतो, कामासाठी देतो तसाच तो सामाजिक कार्यासाठीसुद्धा दिला पाहिजे. आपल्या बँकेच्या 'सहकार्यम् यशोधनम्' या ब्रीदवाक्याप्रमाणे संस्थेत काम करत असताना जशी आपण सर्व सहकाऱ्यांना मदत करतो तशीच सामाजिक बांधिलकीदेखील प्रथम पाहिली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

शेवटच्या सत्रात संघाचे पुणे महानगर संपर्क प्रमुख श्री. प्रसादजी लवळेकर यांचेदेखील मार्गदर्शन लाभले. त्यानंतर आपल्या बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जयंत काकतकर यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. मा. श्री. जयंत काकतकर यांनी बँक असोसिएशनतर्फे केलेल्या कामाचे कौतुक केले. बँकींग क्षेत्रासमोर असलेली आव्हाने, त्याचबरोबर आपल्या बँकेसमोर असलेली आव्हाने याविषयी बोलत असतानाच त्यांनी वसुली ह्या अत्यंत नाजूक विषयासंबंधाने सर्वांनाच त्यांच्यावर असणाऱ्या जबाबदारीची जाणीव करून दिली. त्याचबरोबर महिला वर्गाचे बँकेत असणारे कामाचे स्वरूप, स्वत:च्या अंगावर कार्यभार घेऊन काम पूर्ण करण्याची त्यांची सचोटी याविषयी बोलत असतानाच महिलादेखील गरज पडल्यास वसुलीसाठी बाहेर पडून कसा हातभार लावू शकतात, याबद्दल मार्गदर्शन केले. आपल्या बँकेच्या व्यवसाय वाढीसाठी अधिकाधिक प्रयत्न करणे गरजेचे आहे, ग्राहक सेवा सुधारणे हेदेखील महत्त्वाचे आहे, या दोन्ही गोष्टींचा मेळ घातल्यास व्यवसाय वाढीस वाव देता येईल असे मत त्यांनी व्यक्त केले.

पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

पान नं. १ वरुन...

## बँकेच्या 'जेट पे' ॲपचे उद्घाटन

सोय उपलब्ध आहे. देशातील ११ शहरांमधील विमानतळावरील वेगवेगळ्या खरेदीसाठी या कार्डचा उपयोग करता येणार आहे.

दोन लाखांचा अपघात विमा, वर्षाला रु. पन्नास कॅश बॅक तसेच टेलिफोन, इलेक्ट्रिसिटी, गॅस यांची बिलेदेखील या कार्डाच्या सहाय्याने ग्राहकांना भरता येतील, असे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत काकतकर यांनी सांगितले.

या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत बँकेचे पदाधिकारी श्री. यशवंत ढवळीकर यांनी केले. मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जयंत काकतकर यांनी प्रास्ताविक केले, तर संचालक श्री. सुधीर पंडित यांनी आभार मानले.


# आनंदाची पाठशाळा : 'ओळखा स्वत:ला, घडवा स्वत:ला'

## आवड आणि नैसर्गिक ओढा

तुमचा एखादा मित्र उत्तम निरीक्षण करतो, चौकस असतो, प्रयोग करुन एखादे शास्त्रीय तत्त्व समजून घेतो, काही नवीन संकल्पना वाचली किंवा वर्गात शिकवली गेली तर त्याला अनेक शंका असतात. प्राध्यापकांना विचारून मनातील शंकांचे निरसन करुन घेणे त्याला साधते, तो वर्तमानपत्रातील शास्त्रीय लेख वाचतो, जिज्ञासा पूर्ण करणारी पुस्तके वाचणे त्याला आवडते. दूरदर्शन माध्यमातून शास्त्रीय किंवा निसर्गविषयक माहिती देणाऱ्या वाहिन्या तो आवडीने पाहतो, घरातील नादुरुस्त रेडिओ/किंवा एखादे उपकरण उघडून दुरुस्त करण्याचा किंवा चांगले उपकरण उघडून, निरीक्षण करुन परत जोडण्याचा प्रयत्न करतो. आकाश निरीक्षण, पर्यावरण निरीक्षण अशा गोष्टीत रस घेतो. अशा विद्यार्थ्याला शास्त्र किंवा तंत्रज्ञान या विषयात नैसर्गिक आवड आहे असा अर्थ आपल्याला काढता येईल. अर्थात एवढ्या सर्व गोष्टी कोणी एकाने करणे दुर्मिळ आहे, पण विशिष्ट विषयास अनुसरून जर यातील किंवा यासारख्या गोष्टींमध्ये कोणी विद्यार्थी रस घेत असेल तरीही असा निष्कर्ष काढता येतो.

चित्र काढणे, डिझाईन काढणे, भूमितीय संकल्पना कागदावर रेखाटणे, फोटोग्राफी, पेन्सिल आर्ट, तैलचित्र, मॉडेल्स करणे, कागद वापरुन हस्तकला कौशल्य दाखविणे अशा गोष्टींमध्ये आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना स्थापत्य शास्त्र अथवा डिझाईन अशा क्षेत्रात रस आहे असे मानता येईल.

जर प्रत्येक क्षमता प्रगत असेल किंवा प्रत्येक क्षमता खूप खालच्या पातळीवर असेल तर मग अशांना मार्गदर्शन कसे करता येईल? असा प्रश्न कदाचित सोडवावा लागतो. जर सर्व क्षमता उत्तम असतील तर कोणत्याही क्षेत्रात असा विद्यार्थी चमकू शकेल. अर्थात नुसत्या क्षमता चांगल्या आहेत म्हणून तो एखाद्या




**प्रा. डॉ. श्रीधर चितळे व प्रा. डॉ. चंद्रशेखर चितळे लिखित 'ओळखा स्वत:ला घडवा स्वत:ला' या पुस्तकातील वेचक, वेधक व रोचक भाग क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत.**

क्षेत्रात चमकेलच असे नाही. एखाद्या क्षेत्रात त्याचा नैसर्गिक ओढा असेल ते क्षेत्र त्याच्यासाठी जास्त योग्य ठरेल ज्यांच्या कोणत्याही क्षमता चांगल्या नाहीत अथवा 'सर्वसाधारण' किंवा 'प्रगतीची गरज' अशा प्रकारच्या असतील अशा विद्यार्थ्यांचे अभ्यासात फारसे लक्ष नाही असे म्हणता येईल, अशा वेळी खूप विचारपूर्वक मार्गदर्शन करावे लागेल.

अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत गार्डनरच्या मल्टिपल इन्टेलिजन्स थिअरीप्रमाणे शैक्षणिक बुद्धिमत्ता विशेष चांगली नसली तरी इतर बुद्धिमत्ता कशा आहेत त्यांचे मापन करुन किंवा निरीक्षणाने अनुमान काढून मार्गदर्शन करावे लागते.

मित्रांनो, मला वाटते तुम्ही स्वत:चे त्रयस्थपणे निरीक्षण केलेत आणि वरील पद्धतीने निष्कर्ष काढलेत तर तुम्हाला निश्चितच तुमचे क्षेत्र सापडेल. तुम्हाला 'क्षमता आणि कल' या विषयाबद्दल आणखी माहिती वाचावीशी वाटली तर त्यासाठी संदर्भग्रंथाचा उपयोग करा.

'मित्रांनो, मी बराच वेळ काही सांगत होतो आणि तुम्ही लक्षपूर्वक ऐकत होतात हे मला जाणवले. तुमच्यापैकी कोणीतरी आजच्या सत्रावर काही प्रतिक्रिया दिली तर मला निश्चितच उपयोग होईल.'

'सर, तुम्ही आजच्या सत्रात जे समजावून सांगितलेत ते आम्हा सर्वांना विचारप्रवृत्त करणारे आहे. किंबहुना तुम्ही सांगितलेल्या अनेक गोष्टींबद्दल आमच्या सर्वांच्या मनात अनेक शंका होत्या त्यांचे निराकरण झाले आहे असे मला वाटते', सौरभ म्हणाला. 'मित्रांनो पुढच्या सत्रात आणखी एका महत्वाच्या प्रश्नाचे उत्तर शोधणार आहोत तो म्हणजे तुम्ही स्वत:ला ओळखता का?

'स्वत:ची ओळख करून घ्यायचे म्हणजे नक्की काय?' सौरभने विचारले. 'सौरभ थोडा धीर धर. पुढच्या सत्रात आपण तेच तर सविस्तरपणे पहाणार आहोत. तेव्हा आता इथे आजची चर्चा थांबवू' मी म्हणालो.

### प्रकरण ३
### ओळख स्वत:ची

- स्वत:शी ओळख करण्याची सुरुवात
- क्षमता वाढवणे
- त्रिमितीय विचारक्षमता
- हार्ड स्किल्स आणि सॉफ्ट स्किल्स
- कार्यानुभव
- व्यक्तिगत गुण
- समूहामध्ये वावरताना आवश्यक कौशल्ये

आजच्या सत्रात स्वत:ला ओळखणे म्हणजे काय य प्रश्नाचे उत्तर मला द्यायचे होते. सर्वजण आल्यावर मी सुरुवात केली.

'मित्रांनो, सर्वप्रथम मी एक दोघांना पुढे बोलवणार आहे आणि त्यांना एक प्रश्न विचारणार आहे तेव्हा सर्वांनी नीट लक्ष द्या.'

मी एका तरुणाला त्याचे नाव विचारले. 'प्रथमेश' त्याचे उत्तर.

'पुढे येऊन तुझी ओळख आम्हाला सर्वांना करून दे' मी त्याला म्हणालो.

प्रथमेश पुढे येण्यास थोडा नाखूष दिसला. दोन-तीनदा सांगितल्यावर पुढे आला आणि खाली मान करुन न बोलता उभा राहिला. शेवटी कसेबसे त्याला बोलते करुन त्याच्याकडून माहिती मिळाली ती अशी : प्रथमेश १२वीच्या परीक्षेला सायन्स घेऊन बसला होता. त्याला व्यक्तिशः कॉमर्सकडे जावे असे वाटत होते पण वडिलांच्या आग्रहाने त्याने सायन्स घेतले. त्याला सायन्सचा अभ्यास जड गेला. पास होण्याची खात्री वाटत होती पण १२ वी नंतर मार्ग बदलून इतर काही कोर्स करावा असे वाटत होते. अर्थात कोणता कोर्स निवडावा हे त्याला ठरवता येत नव्हते. शाळेत किंवा महाविद्यालयात त्याने कोणत्याही उपक्रमात भाग घेतला नव्हता. त्याचा मित्रपरिवार मर्यादित होता.

प्रथमेशनंतर हात वर करुन एक मुलगी उभी राहिली. आणि म्हणाली, 'सर मी कल्पना, मलाही माझी ओळख या माझ्या मित्र, मैत्रिणींना करुन द्यायची आहे.'

कल्पनाला मी सर्वांच्या समोर येऊन बोलायला सांगितले. कल्पनाने अस्खलित इंग्रजीमध्ये स्वत:चा परिचय सांगितला, त्याचा सारांश :

कल्पनाने नुकतीच १०वीची परीक्षा दिली होती. तिचे शिक्षण सेमी इंग्लिश माध्यमाच्या शाळेत झाले होते, व इंग्रजी उत्तम होते. कारण घरी तिच्या आईने आणि सवडीप्रमाणे वडिलांनीही तिच्यासाठी खूप परिश्रम घेतले होते. तिला नृत्याची, तसेच गाण्याची आवड होती. भरतनाट्यम हा नृत्यप्रकार ती शिकत होती व त्यात तिची तयारी उत्तम होती. तसेच तिने गाण्याच्या परीक्षा दिल्या होत्या. शाळेत तिने बहुतेक सर्व उपक्रमांमध्ये भाग घेतला होता. अनेक बक्षिसे मिळवली होती. ती वडिलांच्या बरोबर रविवारी सिंहगड चढण्यास नेमाने जात असे.

पुढे डॉक्टर होण्याची तिची इच्छा होती. शाळेमध्ये उत्तम गुण मिळत होते. एकंदरीतच तिच्या बोलण्यातून तिचा आत्मविश्वास स्पष्टपणे दिसत होता. मे महिन्याच्या सुट्टीमध्ये हिमालयात ट्रेक करण्यासाठी एका संस्थेतर्फे ती जाणार होती.

**क्रमशः**

# बँकेच्या मदतीसाठी हडपसर शाखेचे खातेदार मे. मोरे डेअरी यांची तत्परता

बँकेच्या हडपसर शाखेमध्ये असलेल्या एटीएम मध्ये दिनांक ८,९, आणि १० डिसेंबर २०१७ या तीन दिवसांच्या कालावधीमध्ये एकूण १०४१ व्यक्तींनी एटीएम चा वापर केला. यामध्ये अन्य बँकांच्या ९७८ ग्राहकांचा समावेश होता. या कालावधीमध्ये दिनांक १० डिसेंबर २०१७ रोजी एटीएम मधील कॅश संपत आली होती. शाखेमध्ये सुद्धा पुरेशी कॅश उपलब्ध नव्हती. अशा वेळी हडपसर शाखेचे शाखाव्यवस्थापक यांनी शाखेचे खातेदार मे. मोरे डेअरी यांचेशी संपर्क साधला. त्यास अनुकूल प्रतिसाद देऊन मे.मोरे डेअरी यांनी लगेचच कॅश उपलब्ध करून दिली. शाखाव्यवस्थापकांनी आवश्यक पूर्तता करून सदर कॅश स्वीकारून ती एटीएम मध्ये जमा केली. परिणामतः सर्व खातेदारांना निरंतर सेवा देणे शक्य झाले. त्याबद्दल खातेदार मे. मोरे डेअरी यांचे आभार. तसेच हडपसर शाखेच्या सेवकांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे शाखा परिसरातील नागरिकांची सोय होऊन बँकेस उत्पन्नही मिळाले.याबद्दल हडपसर शाखेतील सेवकांचे अभिनंदन !

## श्री. मनिष बोकाडे व श्री. गणेश झरकर यांनी केले गुंतवणूकदारांचे प्रबोधन

म्युच्युअल फंडाची माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पुण्यातील ९ शाखांमधील ग्राहकांसाठी गुंतवणुकीची माहिती देणारा कार्यक्रम सर परशुराम भाऊ कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामध्ये रिलायन्स म्युच्युअल फंडाचे ट्रेनर श्री. मनिष बोकाडे यांनी गुंतवणूकदारांना मार्गदर्शन केले. म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करताना ती विचारपूर्वक असावी, असा बहुमोल सल्ला गुंतवणूकदारांना देण्यात आला. असाच कार्यक्रम बँकेतील सेवकांसाठीसुद्धा घेण्यात आला. या वेळी एलआयसी म्युच्युअल फंडाचे एरिया मॅनेजर श्री. गणेश झरकर यांनी सेवकांना मार्गदर्शन केले आणि छोट्या गुंतवणुकीतून मोठा फायदा मिळविणेसाठी कमी वयात लवकर गुंतवणुकीस सुरुवात करा, असा सल्ला त्यांनी दिला.

### कलेक्शन प्रतिनिधींना व्यवसाय वाढीसाठी मार्गदर्शन

माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये बँकेच्या शाखांसाठी होम सेव्हिंग कलेक्शन करणाऱ्या सर्व प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस १११ प्रतिनिधी उपस्थित होते. होम सेव्हिंग कलेक्शनबरोबरच बँकेच्या व्यवसाय वाढीसाठी त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

### बँकेच्या सर्व शाखांमध्ये 'गुंतवणूक दिवसा'चे यशस्वी आयोजन

मार्केटिंग विभागामार्फत माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ मध्ये इन्शुरन्स आणि म्युच्युअल फंड यासाठी गुंतवणूक दिवसाचे आयोजन बँकेच्या सर्व ७० शाखांमध्ये करण्यात आले. याप्रसंगी शाखांच्या अनेक खातेदारांनी सुरक्षित आणि समृद्ध जीवनासाठी गुंतवणुकीचा निर्णय घेतला.

# मा. संचालक मंडळ यांची लातूर येथे सदिच्छा भेट आणि प्लॅटिनम कार्डचे उद्घाटन



मा. संचालक मंडळ सत्कार समारंभ



प्लॅटिनम कार्ड उद्घाटन समारंभ

आपल्या बँकेच्या मा. संचालक मंडळाने दि. २१ व २२ डिसें., १७ रोजी लातूर शाखेस भेट दिली. शाखेचे व्यवस्थापक श्री. राजेंद्र वर्तक व उपशाखा व्यवस्थापक श्री. सुहास गोवर्धन, सचिन ढवळे व अन्य कर्मचाऱ्यांनी सर्व संचालकांचे शाखेतर्फे स्वागत केले. याच दिवशी मा. संचालक मंडळ सदस्यांनी आपल्या बँकेच्या 'अंबाजोगाई' व 'उदगीर' शाखांनाही भेट दिली. सदर दिवशी सायंकाळी लातूर शाखेतील सेवकांतर्फे 'मातोश्री वृद्धाश्रम' येथे मा. संचालक मंडळ सदस्यांचा सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमाला विवेकानंद हॉस्पिटलचे प्रमुख विश्वस्त श्री. अशोक कुकडे उपस्थित होते. तसेच शाखेचे सर्व स्थानिक सल्लागार समिती सदस्य उपस्थित होते.

दि. २२ डिसे. रोजी मा. संचालक मंडळाची सभा लातूर येथे संपन्न झाली. दुपारी चार ते सहा या वेळेत मा. संचालकांनी लातूर शाखेस भेट दिली. मा. शाखा व्यवस्थापक श्री. राजेंद्र वर्तक यांनी सर्वांचे स्वागत केले. मा. अध्यक्ष श्री. संजय लेले यांनी सदर भेटीत सेवकांना विविध विषयांवर आपल्या भाषणामधून मार्गदर्शन केले. सायंकाळी लातूर, अंबाजोगाई व उदगीर या शाखांमधील काही निवडक मान्यवर खातेदारांसाठी बँकेचे वतीने स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून बँकेने ग्राहकांसाठी 'Platinum Card' चे उद्घाटन केले. लातूर शाखेतील मान्यवर खातेदार श्री. मा. अशोकराव कुकडे, श्री. नितीन कलंत्री, श्री. अजिंक्य सोनावणे, श्री. कल्याण कुलकर्णी व श्री. प्रकाश कासट यांना या प्रसंगी 'प्लॅटिनम कार्डचे' वितरण करण्यात आले. यावेळी अध्यक्ष मा. संजय लेले यांनी बँकेच्या आजपर्यंतच्या यशस्वी वाटचालीत लातूर शहरातील प्रथितयश व मान्यवर खातेदारांचा अमूल्य सहभाग असल्याचे आपल्या भाषणामधून आवर्जून सांगितले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयंत काकतकर यांनी मनोगत व्यक्त करून उपस्थितांचे आभार मानले. बँकेचे उपमहाव्यवस्थापक श्री. सुनील कामत यांनी 'Platinum Card' ची वैशिष्ट्ये उपस्थितांना सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बँकेचे उपमहाव्यवस्थापक श्री. यशवंत ढवळीकर यांनी वैशिष्ट्यपूर्ण शैलीत केले.

**वाचकांना नम्र आवाहन :** शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिंग इ. विषयी असणारी उपयुक्त बातमी, विशेष उपलब्धी, माहिती, गौरव, पुरस्कार किंवा लेख संबंधित छायाचित्रांसह जरूर पाठवावेत. यासाठीचा मजकूर A4 साईजच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्छ अक्षरात लिहून बंद पाकिटातून पुढील पत्त्यावर पाठवावा. यामधील वेधक वेचक मजकूर गरुड झेप मध्ये प्रकाशित केला जाईल. **पत्ता : श्री. राजन कोळपकर, मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कार्यालय, पुणे. मो. क्र. : ९९६०१२३३३१ गरुड झेपसाठीची माहिती, लेख, फोटो इ. ईमेलद्वाराही पाठविता येईल. ✲ ईमेल आयडी : hrd@janatabankpune.com**

गरुड झेप

गरुड झेप ही गृहपत्रिका केवळ खासगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही. गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.
दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)

१२/०१/२०१८